राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ पुणे यांच्यासमोरील
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर,पुणे-४११००१

श्री.दत्तात्रय बबन भोरडे
रा पिंपरी सांडस ता.हवेली जि.पुणे

**<u>सुनावणी दिनांक-२५/०८/२०२५</u>**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये खालील प्राधिकरणांकडे एकूण १५ द्वितीय अपिले (लगतच्या यादीनुसार) दाखल केलेली आहेत.

प्रस्तुतची व्दितीय अपीले दाखल करतांना प्रयोजनामध्ये,जाणूनबुजून माहिती दिली नाही, माहिती मिळाली नाही, ,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश पारित केला नाही,असे प्रयोजन नमूद केलेली आहेत. सदर व्दितीय अपीलांची सुनावणी दि.२५/०८/२०२५ रोजी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी संबंधित प्राधिकरणांचे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांचे लेखी निवेदन आयोगास प्राप्त आहेत.

अपिलार्थीचा माहिती अर्ज त्यावर जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाहीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जास उत्तर | प्रथम अपिल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५२३-२०२५ | १३.१२.२०२४ | - | २३.०१.२०२५ | - |
| २ | १५२४-२०२५ | २१.१२.२०२४ | ३०.०१.२०२५ | २४.०१.२०२५ | ०१.०४.२०२५ |
| ३ | १८७९-२०२५ | १४.०२.२०२५ | - | -- | - |
| ४ | १८८०-२०२५ | १४.०२.२०२५ | - | - | - |
| ५ | २६६९-२०२५ | १०.०३.२०२५ | - | १४.०४.२०२५ | - |
| ६ | ३२०१-२०२४ | २७.१२..२०२३ | - | ०६.०२.२०२४ | - |
| ७ | ३२०२-२०२४ | २२.१२.२०२३ | - | ०५.०२.२०२४ | २०.०५.२०२४ |
| ८ | ३२०३-२०२४ | २२.१२.२०२३ | | ०५.०२.२०२४ | २०.०५.२०२४ |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | ३२०४-२०२४ | २७.१२.२०२३ | २९.१२.२०२३ | ०७.०२.२०२४ | १२.०४.२०२४ |
| १० | ८९७०-२०२४ | ०९.०९.२०२४ | - | १८.१०.२०२४ | १६.०४.२०२५ |
| ११ | ८९७१-२०२४ | २३.०८.२०२४ | २१.१०.२०२४ | ०८.१०.२०२४ | २८.१०.२०२४ |
| १२ | ८९७२-२०२४ | २५.०५.२०२४ | - | ०४.०९.२०२४ | - |
| १३ | ९२०५-२०२४ | १७.०९.२०२४ | - | २०.१०.२०२४ | - |
| १४ | ९२०६-२०२४ | २३.०८.२०२४ | - | ०८.१०.२०२४ | - |
| १५ | ९२१३-२०२४ | १६.०९.२०२४ | - | ०६.११.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान तसेच दि.२५.०८.२०२५ रोजीच्या लेखी निवेदनामध्ये असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही, माहिती दिली नाही. प्रथम अपिल दाखल केले परंतु आजअखेर आदेश पारित केला नाही. प्रथम अपिलाचा लेखी युक्तीवाद स्पीड पोस्टाने पाठविणेत आला होता.तरी मी मागणी केलेली माहिती निशुल्क व शीघ्रातिशीघ्र देण्याचे आदेश पारित करावे.

आज रोजी सुनावणी दरम्यान उक्त प्राधिकरणांच्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांना बहुतांश प्रकरणामध्ये माहिती देणेची कार्यवाही केली आहे. प्रथम अपिलामध्ये निर्णय दिला आहे. काही प्रथम अपीलामध्ये पुन्हा माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार काही प्रकरणामध्ये अवलोकनासाठी उपस्थित राहणेबाबत कळविले असता अपिलार्थी हे अवलोकनासाठी उपस्थित राहिले नाहीत.

उपलब्ध अभिलेखावरुन जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त चार प्रकरणामध्ये माहिती /उत्तर दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी काही प्रकणामध्ये आदेश पारित केले परंतु काही प्रकरणामध्ये सुनावणी घेतली नाही. अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झाले नाही असे त्यांनी लेखी निवेदनामध्ये नमुद केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. लगतच्या यादीमधील सर्व वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, तसेच यापूर्वी दिलेल्या प्रकरणांची माहिती वगळून उर्वरीत ११ प्रकरणांची माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. लगतच्या यादीमधील सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुतचे १५ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

( मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जा.क्र.- ९६८५/२०२५ दिनांक :- २७/१०/२०२५

| अ. क्र. | अपिल क्रमांक | अपिल वर्ष | जिल्हा | अपिलार्थीचे नाव | जन माहिती अधिकारी पदनाम,जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय | प्रथम अपिलीय अधिकारी पदनाम,प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५२३ | २०२५ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | शिरस्तेदार,उप अधीक्षक भूमी अभिलेख हवेली, जि. पुणे. | उप अधीक्षक,उप अधीक्षक भूमी अभिलेख हवेली, जि. पुणे. |
| २ | १५२४ | २०२५ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | वरिष्ठ लिपीक (नगर भूमापन-१),जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे. | कार्यालय अधिक्षक भूमापन-१,जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे. |
| ३ | १८७९ | २०२५ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | जन माहिती अधिकारी,शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे विभाग पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी,विभागीय उप संचालक कार्यालय पुणे विभाग पुणे. |
| ४ | १८८० | २०२५ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | अव्वल कारकून,तहसिल कार्यालय हवेली, ता. हवेली,जी. पुणे. | तहसीलदार,तहसिल कार्यालय हवेली, ता. हवेली,जी. पुणे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २६६९ | २०२५ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | शिरस्तेदार,उप अधीक्षक भूमी अभिलेख पुणे जि.पुणे. | उप अधीक्षक,उप अधीक्षक भूमी अभिलेख पुणे जि.पुणे. |
| ६ | ३२०१ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली |
| ७ | ३२०२ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली |
| ८ | ३२०३ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली |
| ९ | ३२०४ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | जन माहिती अधिकारी,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी ,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे |
| १० | ८९७० | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली |
| ११ | ८९७१ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | जन माहिती अधिकारी,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी ,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे |
| १२ | ८९७२ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | जन माहिती अधिकारी,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी ,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | ९२०६ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, पुणे | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, पुणे |
| १५ | ९२१३ | २०२४ | पुणे | दत्तात्रय बबन भोरडे | मुख्यालय सहाय्यक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, पुणे | उप अधीक्षक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, हवेली, पुणे |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ